# जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद

दूरध्वनी क्र. – 02472–224733 ई–मेल–mahosmdc@mhstate.nic.in

जा.क्र./अभि./४९८०/2025
जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद
दिनांकः– 19/06/2025

**विषय** :– जिल्हा न्यायालय उस्मानाबाद येथील अभिलेख कक्षात जमा असलेली रद्दी विक्री करण्याकरिता अधिकृत शासनमान्य परवानाधारक ठेकेदाराकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत...

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, उस्मानाबाद यांच्या आदेशावरून आपणांस कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय उस्मानाबाद येथील अभिलेख कक्षात व तालुका न्यायालयात जमा असलेल्या न्यायालयीन प्रकरणातील फाडलेले कागदपत्रांची व इतर कागदपत्रांची रद्दी जमा आहे.

सदर रद्दी विक्री करण्याकरिता **सर्वात जास्त दराची निविदा समितीच्या संमतीने मंजुर करून रद्दी विक्री करण्याचे नियोजन केले आहे.** तरी शासनमान्य परवानाधारक ठेकेदाराकडून खरेदीबाबत सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. त्याकरिता आपणांस खालील अटींचे पालन करावे लागेल.

1. महाराष्ट्र शासनाचे छपाई आणि साहित्य नियमावलीच्या प्रकरण 15 नियम 15.1 मधील तरतूदीस अधिन राहून रद्दी विक्री करण्यात येईल.

2. अधिकृत ठेकेदाराकडे शासनमान्य परवाना असणे आवश्यक आहे. सोबत पॅनकार्ड क्रमांक नमूद करण्यात यावा व त्याची छायांकिंत प्रत देण्यात यावी.

3. कार्यालयात गठीत समिती समोर रद्दी मोजण्यात येईल.

4. सदर रद्दी कार्यालयातून वाहतूक करण्याकरिता कार्यालयामार्फत कोणतेही वाहन भाडे, हमाली व इतर खर्च देण्यात येणार नाही. तसेच तालुका न्यायालयातील रद्दीही त्यांनी स्वखर्चाने उचलावी लागेल, त्यासाठीही खर्च देण्यात येणार नाही.

5. ठरविण्यात आलेल्या दरानुसार रक्कम आगाऊ स्वरूपात जमा करण्यात यावी. व तद्नंतरच रद्दी नेण्यास परवानगी देण्यात येईल.

6. रद्दी न्यायालयाच्या आवाराबाहेर नेल्यानंतर त्याच्या विल्हेवाटी संदर्भात सर्व जबाबदारी संबंधित रद्दी खरेदीदाराची राहिल.

**मागे पहा**

7. रद्दीचे वजन करताना रिकाम्या वाहनाचे वजन करून रद्दी वाहनात भरल्यानंतर सदर वाहनाचे वजनकाट्यावर वजन करून रद्दीचे वजन निश्चीत करण्यात येईल त्यासाठीचा खर्च रद्दी खरेदीदाराने करणे बंधनकारक राहील.

8. जिल्हा न्यायालय अभिलेख कक्षातील रद्दीचे वजन करण्याकरिता आवश्यक असणारे मनुष्यबळ खरेदीदाराने घेऊन यावे लागेल. त्यासाठी खर्च दिला जाणार नाही.

9. निविदा/दरपत्रक मोहरबंद पाकीटात असाव्यात व पाकीटावर विषय नमूद केलेला असावा.

10. निविदा/दरपत्रक **दिनांक 08.07.2025** पर्यंत कार्यालयीन वेळेत **सायंकाळी 5.00** वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा/दरपत्रक **दिनांक 09.07.2025** रोजी गठीत समितीसमोर उघडण्यात येतील. यावेळेस आपण अथवा आपला प्रतिनिधी योग्य त्या ओळखपत्रासह हजर राहू शकतो. प्रशासकीय व कार्यालयीन अडचणीमुळे दरपत्रक उघडणे शक्य झाले नाहीतर, लगतच्या दिनांकास अथवा कार्यालयाच्या सोयीनुसार ठरवून दिलेल्या दिवशी उघडण्यात येतील.

11. कोणतेही गोंधळात राहणारी किंवा वेगवेगळे अर्थ निघणारी बाब दरपत्रकात राहणार नाही याची काळजी घ्यावी.

12. निकाली निघालेल्या संचिकेमधील नाश केलेले कागद हे **श्रेडर मशीनद्वारे** /हाताने कट केलेले कटींग करून घेतलेली रद्दी असल्यामुळे सदरील रद्दीचा दर हा निवीदेमध्ये एकच दर्शविण्यात यावा.

13. कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक रद्द करण्याचा किंवा न स्विकारण्याचा अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, उस्मानाबाद यांनी राखून ठेवलेला आहे.

14. दिलेल्या मुदतीत आपले दरपत्रक या कार्यालयास सादर न झाल्यास वरील संपूर्ण अटी आपणांस मान्य नाहीत असे समजण्यात येईल.

15. सदर दरपत्रक मंजूर झालेल्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीकरीता वैध राहिल.

16. जिल्हा मध्यवर्ती अभिलेख कक्षात जमा झालेली रद्दी ही दरमहा घेवुन जाणे संबंधीत ठेकेदारास बंधनकारक राहिल.

तरी संबंधित ठेकेदारांना सूचित करण्यात येते की, सदर रद्दी खरेदी करण्याकरिता आपली सिलबंद निविदा (दरपत्रक) **मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, जिल्हा न्यायालय उस्मानाबाद यांच्या नावे लवकरात लवकर सादर करावे.**

आपला विश्वासू,

प्र. प्रबंधक,
जिल्हा व न्यायालय,उस्मानाबाद.
**( आदेशावरुन )**

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव –
1. संगणक विभाग, जिल्हा न्यायालय उस्मानाबाद, यांच्याकडे जिल्हा न्यायालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.
2. सहा.अधिक्षक रोख वित्त लेखा विभाग, जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद यांच्याकडे नोटीसबोर्डावर डकविण्याकरीता.